# अहिंसा | वीगन

दया आणि अहिंसा हा मानवी जीवनाचा आधार आहे. सुसंस्कृत लोक आयुष्यभर या मानवी मूल्यांशी जोडलेले असतात. म्हणूनच वीगन (अहिंसक) बना.



## प्राणी उद्योगात प्रचलित क्रूर प्रक्रिया

प्राण्यांवर कृत्रिम गर्भाधान, नर बाळांना जन्मताच मारणे किंवा आईपासून दूर करणे, मुबलक अन्न - पाणी आणि हवेचा अभावात प्राण्यांना लहान जागेत घुसमटून ठेवणे, अशा अनेक क्रूर प्रक्रिया आहेत. आपल्या सोयीनुसार त्यांच्या अवयवांना विकृत करून त्यांना आयुष्यभर छळत राहणे आणि शेवटी स्वार्थ आणि लोभापोटी या मुक्या प्राण्यांना मारणे. प्राणी उद्योगात शोषण भोगणारा प्रत्येक प्राणी मानवासारखाच सचेतन आणि वेदनाक्षम असतो. ह्यांतील बहुतेक प्राणी आपण अनैसर्गिकरित्या निर्माण केलेले असतात.

मानवता । अहिंसा । वीगनवाद

YV Care



# कुक्कुटपालन

ब्रॉयलर नावाखाली आपण औषधांनी अनैसर्गिकपणे वाढवलेली दीड महिन्याची लहान पिल्ले खातो. ब्रॉयलर काही आठवड्यांत इतके मोठे केले जातात की त्यांची हाड़े त्यांच्या शरीराचे ओझे सहन करू शकत नाहीत आणि ते वेदनेत पडून राहतात. क्रूर मानव आपल्या स्वार्थ आणि लाभासाठी दररोज १८-१९ कोटी कोंबड्या मारून खातो. ब्रॉयलर ही जगातील सर्वात शोषित प्रजाती आहे.



# अंडी

कोंबडी नैसर्गिकरित्या दरवर्षी १२-१५ अंडी देतात, त्यात आपण एक नवीन प्रजाती (लेयर) निर्माण केली आहे आणि दरवर्षी तिच्याकडून २५०-३०० अंडी जबरदस्तीने उबवतो. सतत अंडी दिल्याने ती ७-८ महिन्यांत अशक्त होते आणि तीची आतडे बाहेर येतात. या क्रूर उद्योगात, जगभरात दररोज २ कोटी नर पिल्ले निर्दयीपणे मारली जातात कारण ते अंडी देऊ शकत नाहीत.

करुणा । समानता । स्वतंत्र्य । जबाबदारी

YV Care



# मेंढी शेळी

संपूर्ण जगभरात मेंढ्या आणि शेळ्यांची एकूण संख्या २००-२५० कोटी आहे. त्यापैकी दरवर्षी आपण सुमारे ९०-१०० कोटी शेळ्या-मेंढ्या मारून खातो. कधी धर्माच्या नावावर ‘बलिदान’ तर कधी चवीसाठी आपण त्यांना मारतो. आपण १५-२० वर्षे जगणाऱ्या मेंढ्या आणि शेळ्यांना १-१.५ वर्षात मारून खातो.



# डुक्कर

डुक्कर हा खुप हुशार प्राणी आहे. त्यांच्यात ४–५ वर्षांच्या माणसाच्या मुलांएवढी समज असते. सध्या जगभरात सुमारे २०० कोटी डुक्करे असणार, ज्या पैकी आपण १०० कोटी दरवर्षी खाऊन टाकतो. मादी डुक्कर वर्षातुन एकदाच जन्म देतात परतु आपण त्यांस जबरदस्तीने वर्षातून ३ वेळा गाभण करतो. सातत्याने गाभण ठेऊन त्यांची पिले आपण चोरतो आणि शेवटी तिला ही मारून खातो.



# मासे

जलचर प्राणी आपल्यापेक्षा भिन्न आहेत त्यामुळे आपण त्यांना आपल्यासारख समझतच नाही. आपण इतक्या मोठ्या संख्येने मासे मारतो की त्यांची संख्या आकड्यांमध्ये मोजता येत नाही. म्हणूनच ती टनांमध्ये मोजली जाते. आपण केवळ मासे मारत नाही तर संपूर्ण समुद्री जीवसृष्टी संपवतोय. याचा थेट परिणाम पर्यावरणावर होत आहे. असेच सुरू राहिले तर आपला विनाश दूर नाही.



# मध

१० ते १२ मधमाश्या आयुष्यभर कष्ट करतात तेव्हा एक छोटा चमचा मध तयार होतं. त्यांच्या जीवनाचा आधार असलेलं मध मनुष्य लोभापोटी काढून (चोरून) घेतो. हे मध त्यांनी स्वत:साठी आणि पुढील पिढीसाठी जमा केले होते. मध उद्योगात दरवर्षी कोट्यवधी मधमाश्या मारल्या जातात. आपण मात्र मधाच्या लोभापायी मध बनवणाऱ्या हजारो मधमाश्यांच्या प्रजाती लुप्त करत आहोत.



# दुग्धव्यवसाय

आज भारत गोमांस निर्यातदारांच्या मध्ये जगात तिसऱ्या स्थानावर आहे. आपल्या दुग्धजन्य पदार्थांच्या वापरामुळे भारताने ही उपलब्धी मिळवली आहे, जिथे निष्पाप वासरे निर्दयीपणे मारली जातात. काही वर्षानंतर जेव्हा गुरे दूध देण्यास सक्षम नसतात तेव्हा मांस आणि चमडयासाठी त्यांना कत्तलखान्यात पाठवले जाते. दुग्धव्यवसायाला समर्थन देऊन आपण वर्षाला ५-६ कोटी निष्पाप जीवांची हत्या करतो.



# चामडे

भारत जगातील सर्वात मोठा चामड्याच्या उत्पादक आहे. ज्याच मुख्य कारण डेअरी उद्योग आहे. दूधासाठी गुरांची मोठ्या प्रमाणात पैदास केली जाते. त्यांचीच नंतर कत्तल करुन चामड़े काढले जाते. चर्मोद्योगातिल कामगारांना आणि तिथल्या परिसराला मोठी हानी होते. त्यामुळे प्रगत राष्ट्रांना हा उद्योग नकोच, परंतु ह्या बाबींकडे भारतात दुर्लक्ष केले जाते. चर्मोद्योगाच्या हानीची व्याप्ती खूप मोठी आहे ज्यामुळे प्राणी, शेती, नद्या आणि संपूर्ण नैसर्गिक व्यवस्थाच नष्ट होण्याचा काठावर आहे.



# लोकर

लोकर निर्माण करणे एक अतिशय क्रूर प्रक्रिया आहे. नर कोकराची अंडकोष निर्दयीपणे काढली जातात. त्यांच्या विष्ठेने आणि लघवीने लोकर खराब होऊ नये म्हणून लहान कोकरूंचे शेपूट आणि त्या सभोवतालची त्वचा ते शुद्धित असताना कापली जातात. त्यांना प्रचंड वेदना होतात.गरम लोखंडी सळीने त्यांची शिंगे जाळली जातात. अशा क्रूर प्रक्रियेत अनेक कोकरे मारली जातात. वारंवार लोकर काढल्यानंतर प्रौढ मेंढ्यांचीही मासांसाठी कत्तल केली जाते.



# रेशीम

एक किलो रेशीमसाठी सुमारे ६,५०० रेशीम किडे जिवंत उकळले जातात. एका सुंदर रेशीम साडीसाठी सुमारे १०,००० - १५,००० रेशीम किडे मारले जातात. म्हणजे आपण दरवर्षी हजारो कोटी किड्यांची हत्या करतो. या क्रौर्याची गरज आहे का? या लालसेपोटी अश्या कीटकांच्या अनेक प्रजाती आपण नष्ट करत आहोत.



YV Care



# पर्यावरण

५१% पेक्षा जास्त  हरितगृह वायू मांस आणि दुग्ध डेअरी उद्योगातून निर्माण होतात. या उद्योगांच्या उत्पादनासाठी आपण दर सेकंदाला १ ते २ एकर जंगल कापत आहोत. मांस आणि दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनात ८ ते २० पट अधिक संसाधने वापरली जातात. परिणामी जागतिक तापमानवाढ, उपासमार आणि वनांवर संकट यांसारख्या गंभीर समस्या उद्भवत आहेत.



# समुद्र

मानव दररोज सुमारे ७५० कोटी इतके समुद्री जीव नष्ट करतो. ही संख्या सध्याच्या एकूण मनुष्य संख्येइतकी आहे. शास्त्रज्ञांच्या अभ्यासानुसार मानवी हस्तक्षेपामुळे येत्या २८ वर्षांत समुद्रांतील जीवसृष्टी संपूर्णपणे नष्ट होईल. आपल्याला ७०% प्राणवायु (ऑक्सीजन) केवळ समुद्री वनस्पतींतून प्राप्त होतो. त्यामुळे समुद्री जीवसृष्टी असणे आपल्यासाठी अत्यावश्यकच आहे.

YV Care



# आरोग्य

कर्करोग, हृदयविकार, मधुमेह इत्यादी प्रचलित आजारांमागे प्राणीजन्य आहार हे सर्वात मोठे कारण आहे. वनस्पतीजन्य/वीगन आहार स्वयंपूर्ण आणि निरोगी असतो. वनस्पतीजन्य आहाराचा अवलंब केल्याने, अनेक लोकांना त्यांच्या गंभीर आजारांपासून सुटका मिळाली आहे व ते आनंदी जीवन जगत आहेत.




# डॉक्टरांचा सल्ला

सर्व, प्रगत डॉक्टर आज वीगन बनण्याची शिफारस करतात. ६०-७०% भारतीय दूध पचवू शकत नाहीत (लैक्टोज असहिष्णु), ज्यामुळे त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते. त्याच वेळी, मांस आणि दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनामुळे कर्करोग, हृदयविकार आणि मधुमेह यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. आपण सर्व प्रकारची फळे, फुले, भाज्या, शेंगा, अक्खे दाणे आणि धान्य इत्यादी वनस्पतीजन्य अन्नच खावे.

**अधिक माहितीसाठी**

**इंडियन वीगन गठ**

events@yvcare.in

+91 8928302122